# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी

---

विद्यापीठ सेवेतील अस्थायी अधिकारी/
कर्मचारी यांना स्थायित्व प्रमाणपत्र
लागु करणे बाबत.

वाचा : -

१. महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांकः स्थाप्रप-१४१४ (प्र.क्र.७३/१४)/१३-अ दिनांक ११.९.२०१४.

२. विद्यापीठ परिपत्रक क्र.ऐपीसी-२/२४९५ दि.१६.८.२०१६

## परिपत्रक

**समय-२०२२/प्र.क्र./स्थायित्व/आस्थापना-५ /1572**

**दिनांक :-०९/०२ / २०२२.**

प्रकरणी उक्त शासन परिपत्रकानुसार प्रथम नियुक्तीच्या पदावर ३ वर्षाची नियमित सेवा पुर्ण करणा-या व त्यामधील अटी / शर्तीची पुर्तता करणा-या विद्यापीठातील अस्थायी गट अ, ब, क व ड मधिल अधिकारी/कर्मचारी यांनी स्थायित्व प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. परंतु गट ड मधील कर्मचारी वगळता इतर गटातील अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना नियुक्त्या मार्फत स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात येत नाही.त्यामुळे विद्यापीठ अधिकारी/कर्मचारी यांचे पदोन्नतीकरीता तसेच निवृत्तीवेतन विषयक प्रकरणे निकाली काढणे हेतु अडचणी निर्माण होत आहेत.

त्यामुळे, विद्यापीठातील अस्थायी गट अ,ब व क मधील अधिकारी/कर्मचारी यांना स्थायित्व प्रमाणपत्र देण्याची बाब विचाराधीन आहे.

याव्दारे, विद्यापीठातील अस्थायी गट अ,ब व क मधील अधिकारी/कर्मचारी यांना नियुक्ती प्राधिकारी वनामकृवि, परभणी यांचे कडुन संदर्भीय शासन परिपत्रकासोबतच्या परिशिष्ट अ मध्ये सुचना/अटी/शर्ती चे अधिन राहुन स्थायित्व प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे, व त्याची नोंद संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी. तसेच कार्यालय प्रमुखांनी सदरची प्रत संबंधीताच्या सेवापुस्तकात लावावी. सदरील परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

मा.कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने....

(धिरजकुमार रा. कदम)
**कुलसचिव**

**प्रत :**

१.संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि),वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
२.संचालक (संशोधन), वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
३.संचालक, विस्तार शिक्षण संचालनालय, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
४.नियंत्रक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
५.विद्यापीठ अभियंता, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
६.उप कुलसचिव (आस्था), वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
७.सर्व आस्थापना शाखा प्रमुख कुलसचिव कार्यालय, वनामकृवि परभणी.
८.सर्व कार्यालय प्रमुख, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
९.प्रभारी अधिकारी, संगणक केंद्र, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, आपणास पुरविण्यात आलेले परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

**प्रतिलिपी :** मा.कुलगुरू महोदय यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव.